


### कर्दळीवनातील
### ५ पवित्र स्थानांचे दर्शन घडविणारी

# कर्दळीवन परिक्रमा

## (श्रीशैल्यसह)

### नोव्हेंबर ते जून

- ❇ आत्तापर्यंत ५१०० हून अधिक भाविक भक्तांसह ६४ यशस्वी परिक्रमा ❇
- ❇ सर्व पवित्र स्थानांचे यथासांग, परिपूर्ण दर्शन – अनुभवी मार्गदर्शक ❇
- ❇ मर्यादित संख्येची बॅच – नेटके नियोजन

**आता ऑनलाईन बुकिंग करा**

ज्येष्ठ नागरिकांना प्रती व्यक्ती
रु. ५००/– सवलत
(डायरेक्ट श्रीशैल्य सोडून)

**मुंबई ते मुंबई ( रेल्वे + बस) रु. ९०००/–**
**पुणे ते पुणे ( रेल्वे + बस) रु. ८००१/–**
**डायरेक्ट श्रीशैल्य रु. ५५०२/–**

१० व्यक्तींच्या ग्रुपबरोबर
११ वी व्यक्ती मोफत

सर्व माहिती, नोंदणी अर्ज व वेळापत्रक www.kardaliwan.com/parikrama वेबसाईट आणि 7057617018 व्हॉटस्अ‍ॅप वर उपलब्ध.

**कर्दळीवन परिक्रमेचे व्हिडिओ यू–ट्युब व व्हॉटस्अ‍ॅप वर पहा**

॥कर्दळीवन॥
**सेवा संघ**

६२२, जानकी रघुनाथ, पुलाची वाडी, झेड ब्रिज जवळ, डेक्कन, पुणे – ४११ ००४.
फोन : (०२०) २५५३०३७१ / २५५३४६०१ ईमेल : swami@kardaliwan.com
मोबाईल : ९३७११०२४३९ / ९६५७७०९६७८

**मुंबई नोंदणी केंद्रे**

- ✦ ठाणे – श्री. कौस्तुभ जोशी – हार्मनी टुर्स – ९८२०६९२६१४/९९८७७२५१३१
- ✦ डोंबिवली – श्री. श्रीकांत जोग – ९६१९६७६३१५
- ✦ कल्याण – श्री. रवींद्र परांजपे – ९८१९१८६३६८ ✦ सायन – श्री. राजेश वैद्य – ९८२०३९५२२७

।। श्री गुरूदेव दत्त ।। श्री स्वामी समर्थ ।।

# कर्दळीवन पंच-परिक्रमा

**सप्रेम नमस्कार वि. वि.**

आपण कर्दळीवन पंच-परिक्रमेमध्ये सहभागी होणार आहात, याबद्दल आपले मन:पूर्वक अभिनंदन ! आता तेथे प्रत्यक्ष जाऊन आपण कर्दळीवनाची दिव्य अनुभूती घेणार आहात. परिक्रमेमध्ये सहभागी होण्यापूर्वी ''**कर्दळीवन : एक अनुभूती**'' हे पुस्तक वाचावे आणि ''**व्हिडीओ डिव्हीडी पहावी**'', त्यामुळे आपल्याला कर्दळीवन पंच परिक्रमेची कल्पना येईल. कर्दळीवनाचा व्हिडिओ यु-ट्यूबवर www.youtube.com/user/kardaliwan/videos वर आणि व्हॉटस्ॲप वर देखील पाहता येतील.

कर्दळीवन परिक्रमांसाठी ''**प्रथम नोंदणी प्रथम प्रवेश**'' या तत्त्वावर नाव नोंदणी सुरू आहे. **नोंदणी करताना रू. ४०००/- एवढी रक्कम भरावी लागेल. परिक्रमेमध्ये सहभागी होण्यासाठी केलेली नोंदणी कोणत्याही कारणाने रद्द करता येणार नाही. आणि नोंदणी रक्कम परत मिळणार नाही.** परिक्रमे दरम्यान आधी विहित केलेली एखादी कृती काही अपरिहार्य कारणामुळे रद्द झाल्यास कोणताही परतावा मिळणार नाही. **किमान १५ दिवस आधी कळवल्यास तारखांची अदलाबदल करता येईल**. परिक्रमेच्या तारखेआधी १५ दिवस उर्वरित रक्कम भरावी लागेल.

**कर्दळीवनात एकूण ५ प्रमुख ठिकाणे आहेत. एकूण अंतर खालीलप्रमाणे आहे.**

**(१) वेंकटेश किनारा ते अक्कमहादेवी गुहा - ९ कि.मी.**

यामध्ये जाण्यासाठी दगडधोंड्यानी भरलेली पायवाट आहे. तसेच आजूबाजूला जंगल आहे. या टप्प्यावरील पर्वतांचे खडे (उभे) चढण आहे. यामध्ये कोठेही पाण्याची किंवा कसलीही सोय नाही. सगळ्यात जास्त दमछाक या टप्प्यामध्ये होते. साधारण चालीने सुदृढ व्यक्तीला ३ ते ४ तासात हे अंतर पार करता येते. वयस्कर व्यक्तींना हळूहळू गेल्यास जास्तीत जास्त ५ ते ६ तास लागू शकतात.

**(२) अक्कमहादेवी गुहा ते प्रकट स्थान - ५ कि. मी.**

हा मार्ग तुलनेने सरळ आहे. फारसे चढण वा उतरण नाही. मात्र यामध्ये अतिशय घनदाट जंगल आहे. दुतर्फा उंच वारुळे आहेत. अनेकदा पायवाटेवर पडलेल्या वृक्षवेली बाजूला सारून पुढे वाट काढत जावे लागते. पायवाट नागमोडी वळणावळणांची आणि खाचखळग्यांनी भरलेली आहे. या ठिकाणी अक्कमहादेवी गुहेपासून साधारणपणे २ ते ३ तासात पोहोचता येते. मूळ स्थानी पाण्याचा छोटा धबधबा, एक छोटी गुहा आणि त्यामध्ये शिवलिंग आणि स्वामींची मूर्ती आहे. येथे स्नान करून पूजा करता येते.

**(३) प्रकटस्थान ते मार्कंडेय ऋषी तपोभूमी - २ कि. मी.**

ही पायवाट देखील घनदाट जंगलाने, दाट वृक्षवेलींनी वेढलेली आहे. तेथे जाण्यास प्रकट स्थानाहून अर्धा तास लागतो.

**(४) मार्कंडेय ऋषी तपोभूमी ते अक्कमहादेवी गुहा - ७ कि.मी.**

गेलेल्या मार्गाने प्रकट स्थानावरुन पुन्हा अक्कमहादेवी गुहेत यावे लागते. तेथे मुक्काम करता येतो.

**(५) वेंकटेश किनारा ते श्री अक्कमहादेवी मंदिर - २ कि. मी.**

वेंकटेश किनाऱ्याच्या डाव्या बाजूला पाताळगंगा नदी पार करुन अक्कमहादेवी मंदिराकडे जावे लागते. हे मंदिर पर्वताला नैसर्गिक छिद्र पडून हे मंदिर तयार झाले आहे. साधारणपणे ३०० मीटर आत बॅटरी किंवा मेणबत्तीच्या प्रकाशात चालत गेल्यावर तेथे एक छोटे शिवलिंग आहे. हा एक अद्‌भूत अनुभव आहे. तेथेच बाहेर श्री अक्कमहादेवीची दगडी शिळेमध्ये कोरलेली अप्रतिम मूर्ती आहे.

**कर्दळीवन सेवा संघातर्फे पंच–परिक्रमेसाठीची व्यवस्था खालीलप्रमाणे करण्यात आली आहे. भाविकांची अधिकाधिक सोय व्हावी आणि त्यांना कमीत कमी कष्टामध्ये ही पंचपरिक्रमा पूर्ण करता यावी, यासाठी कर्दळीवन सेवा संघाने या पंच–परिक्रमेची आखणी केली आहे.**

(१) कर्दळीवन पंच–परिक्रमेमध्ये दक्षिण भारतीय पद्धतीच्या भोजनामध्ये भात, भाजी, चटणी, लोणचे इ. नाष्ट्यामध्ये उपमा, पोहे इ. तसेच त्याचबरोबर चहाची व्यवस्था आहे. त्या भागात पोळी/चपाती मिळत नाही. त्यामुळे त्याचा आग्रह धरू नये. या परिक्रमेत उपवासासाठी आणि कांदा लसणा शिवायच्या आहाराची कोणतीही व्यवस्था नाही.

(२) कर्दळीवनामध्ये मुक्कामांच्या ठिकाणी कॅरीमॅटचे अंथरुण यांची व्यवस्था केली आहे. ते वजनाचे हलके असून प्रत्येकाला कर्दळीवनात वेंकटेश किनारा ते अक्का महादेवी गुहा बरोबर घेऊन जावे लागेल आणि परत वेंकटेश किनारी आणावे लागेल. येथे डोंगरचढणीचा मार्ग असल्याने हातात काठीची व्यवस्था केली आहे. स्वतःची सॅक स्वतः उचलून न्यावी लागेल. आधी कल्पना दिल्यास हमालाची व्यवस्था होईल. त्यांचे वेगळे शुल्क त्यांना द्यावे लागेल. साधारणपणे एकूण सुमारे ३६ कि. मी. एवढे अंतर चालावे लागेल.

(३) पंच–परिक्रमेमध्ये फर्स्ट एड तसेच काही नेहमी लागणाऱ्या औषधांची व्यवस्था केली आहे.

(४) कर्दळीवन पंच–परिक्रमेसाठी स्त्री आणि पुरुष या सर्वांना मुक्त प्रवेश आहे.

(५) पूर्णतः निर्मनुष्य परिसर असल्यामुळे ५ ते ६ तासांशिवाय कोणतीही वैद्यकीय मदत मिळणे शक्य नाही. स्वतःला लागणाऱ्या गोळ्या औषधे बरोबर घ्यावीत. परिक्रमेमध्ये सहभागी होण्याची वैयक्तिक जबाबदारी प्रत्येकाची राहील. याचा विचार करुनच या परिक्रमेत सहभागी व्हा. आपल्या कुटुंबियांना पूर्ण कल्पना देऊनच सहभागी व्हा.

❖ ❖ ❖

# विशेष महत्त्वाच्या सूचना

(१) **प्रत्येकाने नोंदणी अर्जाबरोबर फोटो आयडेंटी कार्ड उदा. पॅनकार्ड, मतदार ओळखपत्र, आधार कार्ड यापैकी काहीतरी एक द्यावे.**

(२) दंतमजन, पाण्याची बाटली, टोपी, टॉर्च, ताट, वाटी, पाणि आणि चहासाठी फुलपात्र, चादर, बेडशीट प्रत्येकाने स्वत: बरोबर घ्यावे.

(३) महिलांसाठी स्नानाची / संडासची वेगळी व्यवस्था नाही.

(४) ज्यांना वेळेवर औषधे घ्यावी लागतात आणि त्याआधी खावे लागते, अशा व्यक्तींनी त्यासाठी सुके खाद्य पदार्थ स्वत:बरोबर घ्यावेत. कारण अनेकदा परिस्थितीमुळे नाष्टा किंवा जेवणाची वेळ मागेपुढे होऊ शकते.

५) कर्दळीवनात वेंकटेश किनारा ते अक्कामहादेवी गुहा – प्रकट स्थान आणि पुन्हा वेंकटेश किनारा या दरम्यान नाष्टा किंवा जेवणाची वेळ मागेपुढे होऊ शकते. नाष्ट्यासाठी सुक्या स्वरूपाच्या पदार्थांचा आणि बिस्कीटे यांचा आधार घ्यावा लागतो. काही अचानक अडचणी येऊ शकतात. त्यावेळी ॲडजेस्टमेंट करावी लागेल.

(६) परिक्रमेदरम्यान गैरसोयी अधिक प्रमाणावर व्हायची शक्यता आहे. कारण तेथील परिस्थिती ही सतत बदलत असते. तिच्यावर नियंत्रण करणे खूप अवघड आहे. तेथे जाताना फॉरेस्ट डिपार्टमेंटचे जाचक नियम, अटी, होडीवाल्यांची आणि होडीची उपलब्धता, विलंब, संप, भोजनाचे सामान वाहून नेण्यासाठी हमालांची अनुपलब्धता अशा अनेक प्रकारच्या अडचणी अचानक निर्माण होतात. त्यावेळी अनेकदा नाईलाज होतो. या सर्व प्रकारच्या परिस्थितीमध्ये ज्यांना ॲडजेस्ट होणे शक्य असेल त्यांनीच या परिक्रमेमध्ये सहभागी व्हावे, ही विनंती.

(७) सरकारी अनास्था, इतर धर्मियांचा विरोध, नक्षलवादी कारवाया, परिक्रमेला न मिळणारी परवानगी, भाषेचा अडथळा, स्थानिक लोकांचे आठमुठे वागणे, इ. अनेक समस्यांचा सामना करून आम्ही भाविकांसाठी कर्दळीवन परिक्रमा आयोजित करीत आहोत. कर्दळीवन सेवा संघ म्हणजे ट्रॅव्हल एजन्सी किंवा फॅसिलिटी/ सर्व्हिस प्रोव्हायडर नाही. ज्यांना कर्दळीवनात जायची तीव्र इच्छा आहे, त्यांचेसाठी सेवा भावनेने आम्ही हे कार्य करीत आहोत. त्यामुळे परिक्रमेची फी भरली आहे, आता आम्हाला सर्व लिहिलेल्या सुविधा पुरवायलाच हव्यात, असा आग्रह धरता येणार नाही, याची कृपया नोंद घ्यावी ही विनंती.

(८) आम्ही फी म्हणून एवढी रक्कम भरली आहे, आता आम्हाला सर्व सोयी सुविधा वेळच्या वेळी मिळायलाच हव्यात आणि भरलेल्या पैशांची वसुली झालीच पाहिजे, अशा प्रकारचा दृष्टीकोन असणाऱ्या व्यक्तींनी कृपया या परिक्रमेत सहभागी होऊ नये, ही विनंती.

(९) गेल्या काही वर्षात हजारो भाविकांना कर्दळीवनात जाता आलेले नाही. त्यांना श्रीशैल्य, पाताळगंगा किंवा मधूनच परत यावे लागले आहे. याही परिस्थितीमध्ये कर्दळीवन सेवा संघ निष्ठेने आणि सर्व प्रकारच्या संकटांचा सामना करून कर्दळीवन परिक्रमा आयोजित करीत आहे, याची प्रत्येकाने नोंद घ्यावी अशी विनंती आहे.

(१०) आपल्याला परिक्रमेसंबंधी ज्या काही सूचना करायच्या असतील त्या परिक्रमा संपल्यावर लेखी स्वरूपात कराव्यात. तेथील पवित्र आणि मंगल परिसरात आयोजक आणि इतर कोणाबरोबर कोणत्याही प्रकारचे वाद घालून नये. त्यामुळे फॉरेस्ट आणि पोलीस कारवाई होण्याची शक्यता आहे. याची प्रत्येकाने नोंद घ्यावी. कारण तो सर्व भाग नक्षलवादी आणि संरक्षित टायगर प्रोजेक्ट कायद्याअंतर्गत येतो. त्यामुळे पुढील सर्व परिक्रमा रद्द होण्याची शक्यता आहे.

(११) गैरसोय हीच मुख्य सोय असण्याची शक्यता आहे, असे खात्रीपूर्वक समजून उमजून या सर्वांशी सामना करायची मानसिक आणि शारीरिक क्षमता असणाऱ्या व्यक्तींनीच परिक्रमेमध्ये सहभागी व्हावे ही विनंती. श्रीदत्तप्रभूंच्या गुप्तस्थानाचे आणि श्रीस्वामी समर्थांच्या प्रकट स्थानाचे दर्शन सहजसाध्य नाही, त्यासाठी उत्कट इच्छेबरोबरच सर्व प्रकारच्या शारीरिक आणि मानसिक अडचणींबरोबर सामना करावा लागेल अशी खूणगाठ प्रत्येकाने मनात बाळगावी.

❖ ❖ ❖

# कर्दळीवन पंच-परिक्रमा करणेसाठी आवश्यक बाबी

(१) कर्दळीवन पंच परिक्रमा नोंदणी अर्ज आणि संमती + हमीपत्र (नमुना जोडला आहे) + आयडी प्रुफ (आधारकार्ड/ पॅनकार्ड/निवडणूक ओळखपत्र यापैकी एक) + १ फोटो आयडेंटि साईज कार्यालयात जमा करावा लागेल किंवा ईमेल द्वारा किंवा कुरियरने पाठवता येईल.

(२) स्वत:चे कपडे एक अंगावर-अधिक २ कपडे जोड, रात्री झोपताना लागणारे कपडे चादर आणि बेडशीट बरोबर घ्यावेत. नेहमी लागणारी औषधे, इतर वस्तू आपल्या बरोबर घ्याव्यात. तसेच कमीत कमी कपडे आणि सामान घ्यावे. हाफ पँट किंवा बर्मुडा घेऊ नयेत. पायात बूट (स्पोर्ट शूज) असावेत, मौल्यवान वस्तू घेऊ नयेत. सामानासाठी पाठीवरची सॅक घ्यावी. पिशवी किंवा प्रवासी बॅग घेऊ नये.

(३) कर्दळीवन पंच-परिक्रमा हा एक उत्कट, चैतन्यदायी आणि दैवी आध्यात्मिक अनुभव असल्याने ज्यांना पुरेसा वेळ काढता येईल, त्यांनीच सहभागी व्हावे, अशी विनम्र विनंती भाविकांना आहे.

(४) कर्दळीवन पंच-परिक्रमेबरोबर पीठापूर, कुरवपूर, गाणगापूर, कडगंची, अक्कलकोट अशी कोणतीही तीर्थस्थाने संलग्न करता येत नाहीत. कारण कर्दळीवन हे ठिकाण एका बाजूला दुर्गम ठिकाणी वसलेले आहे.

प्रत्येक परिक्रमार्थीने कर्दळीवनाची भरभरून अनुभूती घ्यावी, अशा पद्धतीने या पंच-परिक्रमेचे नियोजन केले आहे. कर्दळीवनात पहिल्यांदा गेल्यावर पुन्हा कधी जाता येईल हे श्री दत्तप्रभूंच्या आणि श्री स्वामी समर्थांच्या इच्छेवरच अवलंबून आहे. हा अनुभव आपले अष्ट सात्विक भाव जागृत करणारा, दैवी अनुभूती देणारा, आपले मनोबल उंचावणारा आणि कदाचित संपूर्ण आयुष्य बदलून टाकणारा असेल असे वाटते. त्यासाठी आपणाला सर्वतोपरी सहाय्य करावे असा आमचा या नियोजनाचा हेतू आहे. कर्दळीवन ही कोणतीही पिकनिक नाही किंवा ट्रेकिंग नाही. स्वत:ला अंतर्बाह्य प्रगल्भ करणारा एक प्रवास म्हणूनच कर्दळीवन पंच-परिक्रमेकडे प्रत्येकाने पाहिले पाहिजे. या परिक्रमेने आपली प्रापंचिक, ऐहिक संकटे दूर होण्यास तर मदत होईलच, त्याचबरोबर आपली आध्यात्मिक उन्नती होईल. आपली साधना बळकट होईल, जीवनात एक अपूर्व आनंद निर्माण होईल. श्री दत्तप्रभूंची आणि श्री स्वामी समर्थांची आपल्यावर निश्चितच कृपा होईल, याची अनुभूती या पंच-परिक्रमे दरम्यान प्रत्येकाने घ्यावी.

# कर्दळीवन पंच-परिक्रमेसाठी व्यवस्था सेवा- सहयोग राशी खालीलप्रमाणे

| | | |
|---|---|---|
| ज्येष्ठ नागरिकांना<br>प्रती व्यक्ती<br>रु. ५००/- सवलत<br>(डायरेक्ट श्रीशैल्य सोडून) | **मुंबई ते मुंबई ( रेल्वे + बस) रु. ९०००/-**<br>**पुणे ते पुणे ( रेल्वे + बस) रु. ८००१/-**<br>**डायरेक्ट श्रीशैल्य रु. ५५०२/-** | १० व्यक्तींच्या ग्रुपबरोबर<br>११ वी व्यक्ती मोफत |

---

**खात्याचे नाव :- दत्त कर्दळीवन परिक्रमा संघ** **बँकेचे नाव :- बँक ऑफ महाराष्ट्र, डेक्कन जिमखाना पुणे शाखा,**

**चालू खाते क्र. 60181419765** **IFS Code : MAHB0000003**

## नियम व अटी

(१) परिक्रमेसाठी मर्यादित जागा उपलब्ध असल्याने ''**प्रथम आलेल्यांना प्रथम प्रवेश**'' या तत्त्वावर प्रवेश दिला जाईल. फोनवरुन, ईमेल द्वारे, एस. एम. एस. द्वारे नाव नोंदणी केली जाणार नाही. नोंदणी अर्ज, संमती + हमीपत्र + आयडी प्रुफ (आधारकार्ड/पॅनकार्ड/ निवडणूक ओळखपत्र यापैकी एक) + १ फोटो आयडेंटि साईजसह आणि रक्कम भरल्यावरच नोंदणी नक्की होईल.

(२) परिक्रमांच्या वेळापत्रकाप्रमाणे नोंदणी करून आपली जागा पक्की करावी. परिक्रमेसाठीची रक्कम आमच्या कार्यालयात रोखीने, चेकने किंवा आमच्या बँक ऑफ महाराष्ट्रच्या खात्यावर रोखीने, चेकने, ऑनलाईन ट्रान्सफर करुन भरता येईल. परिक्रमेदरम्यान हैद्राबाद पर्यंतचा रेल्वे प्रवास स्लिपर क्लासने करण्यात येईल. ज्यांना एसी किंवा अन्य क्लासचे तिकीट हवे असेल त्यांना अधिक रक्कम भरून तसे रेल्वे तिकीट काढता येईल.

(३) परिक्रमेमध्ये कर्दळीवन सेवा संघाने तयार केलेले नियम आणि शिस्त कसोशीने पाळावे लागतील. त्याबाबत नंतर तक्रार चालणार नाही. त्या सर्वांची माहिती नोंदणी अगोदरच करुन घ्यावी ही विनंती. ऐनवेळी परिस्थितीनुरूप परिक्रमेच्या कार्यक्रमात बदल करण्याचा अधिकार कर्दळीवन सेवा संघाने राखून ठेवलेला आहे, याची नोंद घ्यावी. कोणतीही माहिती, शंका, अडचण विनासंकोच, मोकळेपणाने आणि प्रांजळपणे आधीच विचारून आणि समजून घ्यावी. मनाचे समाधान झाल्यावरच परिक्रमेसाठी नावनोंदणी करावी ही विनंती.

(४) कर्दळीवन पंच-परिक्रमा करीत असताना जाता-येता समूहाबरोबरच असावे. एकट्या दुकट्याने पुढे जाऊ नये किंवा मागे राहू नये. आपल्या गटापासून हाकेच्या अंतरावर रहावे. कर्दळीवन परिक्रमेदरम्यान राजकीय, भौतिक व घरगुती विषयांवरील चर्चा कटाक्षाने टाळाव्यात,वाद घालू नये. रात्रीच्या मुक्कामात एकटे बाहेर जाऊ नये. दोन-तीन जणांना बरोबर घेऊनच जावे. सोबत बॅटरी हाती घेऊनच जावे.

(५) कर्दळीवन परिक्रमेमध्ये श्रीगुरुचरित्र, श्रीपाद श्रीवल्लभ चरित्र आणि आपल्या आवडत्या ग्रंथाचे वाचन करावे.

(६) कर्दळीवन परिक्रमेमध्ये प्लॅस्टिकच्या वापराला पूर्णपणे बंदी आहे. कोणतीही प्लॅस्टिकची वस्तू बरोबर घेऊ नये.

(७) कर्दळीवन परिसरात कोणत्याही प्रकारचे व्यसन करण्यास बंदी आहे.

(८) कर्दळीवनात अक्कमहादेवी गुहा आणि स्वामी समर्थांचे मूळ स्थान या ठिकाणी स्नान करताना कोणत्याही प्रकारे अंगाला साबण, कपड्यांचा साबण वापरण्याला बंदी आहे. तसेच शॅम्पूचे सॅशे, तेलाच्या बाटल्या, पाऊच तेथे नेऊ नयेत. कोणत्याही रसायनांचा वापर तेथे करू नये. त्यामुळे तेथील पवित्रतेला बाधा येते हे ध्यानात घ्यावे.

(९) परिक्रमेमधील ग्रुपची किमान सभासद संख्या ३० आणि कमाल संख्या ६० एवढी असेल. त्याहून कमी संख्या असल्यास पुढील परिक्रमेमध्ये ॲडजेस्ट केले जाईल.

(१०) सर्व प्रकारच्या तक्रारी, दावे यासाठी न्यायालयीन प्रक्रियेची सीमा, पुणे शहर न्यायालयीन क्षेत्र हे राहील.

❖ ❖ ❖

# कर्दळीवन पंच - परिक्रमा रचना आणि आयोजन

१. **पुणे येथून :** परिक्रमेच्या पहिल्या दिवशी पुणे रेल्वे स्थानकावर प्लॅटफॉर्म क्र. १ येथे मनशक्ती बुक स्टॉल जवळ यावे. तेथे यायची वेळ, स्वयंसेवकाचे नाव आणि मोबाईल नंबर आपल्याला २ दिवस आधी आपल्या मोबाईल क्रमांकावर एसएमएस् द्वारे कळविला जातो.

२. **मुंबई येथून :** परिक्रमेच्या पहिल्या दिवशी मुंबई येथे रेल्वेमध्ये बसायचे आहे. मुंबईमधील ज्या केंद्रावर आपण नोंदणी केली असेल तेथून आपल्याला जायचे आणि परतीचे रेल्वे तिकीट दिले जाईल. हैद्राबाद येथे रेल्वे स्टेशनवर आमच्या स्वयंसेवकाशी भेट होईल. स्वयंसेवकाचे नाव आणि मोबाईल नंबर आपल्याला २ दिवस आधी आपल्या मोबाईल क्रमांकावर एसएमएस् द्वारे कळविला जातो.

३. **डायरेक्ट श्रीशैल्य :** श्रीशैल्य येथे आदल्या दिवशी दुपारी ३ नंतर डायरेक्ट पोचावे लागते. तेथे राहण्याची व्यवस्था केलेली असते. तेथून पुढे कर्दळीवन परिक्रमा पूर्ण करून श्रीशैल्य येथे परत आल्यावर परिक्रमा संपते. श्रीशैल्य येथे येण्यासाठी हैदराबाद येथे यावे लागते. देशभरातून सर्व मुख्य ठिकाणाहून रस्ता, रेल्वे आणि विमानसेवेमार्फत हैदराबाद जोडले गेले आहे. महाराष्ट्रातील बहुतेक सर्व जिल्ह्याच्या ठिकाणाहून हैदराबाद येथे सरकारी आणि खाजगी लक्झरी बसेस सेवा उपलब्ध आहे. रेल्वेने सुद्धा हैदराबाद येथे पोहोचता येते. हैदराबाद ते श्रीशैल्य हे अंतर २१० कि.मी. एवढे असून त्याचे तिकीट साधारण ३००/- रू. च्या दरम्यान आहे. हैदराबाद आणि सिकंदराबाद ही दोन मुख्य रेल्वे स्थानके असून हैदराबाद येथील महात्मा गांधी बस स्थानक या मुख्य बस स्थानकावरून सकाळी ६ वाजल्यापासून दर ३० मिनिटांनी श्रीशैल्य येथे जाण्यासाठी बसेस उपलब्ध आहेत.

# कर्दळीवन पंच-परिक्रमा

## नोंदणी अर्ज

## कार्यालयीन उपयोगासाठी

**परिक्रमेचा प्रकार**

| | |
|---|---|
| **डायरेक्ट** | |
| **पुणे ते पुणे** | |
| **मुंबई ते मुंबई** | |

| | | |
|---|---|---|
| परिक्रमा दिनांक : | जमा केलेली रक्कम : | रोख : (कार्यालय/बँक) |
| नोंदणी दिनांक : | बाकी रक्कम : | चेक : (कार्यालय/बँक) |
| | | ऑनलाईन : |

(१) नावः– श्री/सौ/श्रीमती/कु. ______

(२) पूर्ण पत्ताः– ______

______

फोन नंः– ______

(३) मोबाईलः– (१) ______ (२) ______

(४) ईमेलः– ______

(५) जन्मतारीखः– ______ वय ______ लिंग : स्त्री / पुरूष ______

(६) व्यवसायः– ______

(७) यापूर्वी मोठ्या परिक्रमा/यात्रा केल्या आहेत का? कोणत्या?

______

(८) श्री दत्त संप्रदाय – श्री स्वामी संप्रदाय याचे भक्त, अनुयायी आहात का?

______

(९) यापूर्वी कोणत्या दत्तस्थानी गेला आहात?

______

(१०) आपले कुटुंबीय आणि जवळचे नातेवाईक यांना आपण कर्दळीवन पंच–परिक्रमेत सहभागी होणार आहात याची पूर्ण कल्पना दिली आहे का?

______

(११) कर्दळीवन पंच–परिक्रमेची सर्व माहिती, नियम, अटी आपण समजावून घेतल्या आहेत का?

______

मी कर्दळीवन परिक्रमेमध्ये स्वतःच्या इच्छेने, पूर्णतः स्वतःच्या जबाबदारीवर सहभागी होऊ इच्छितो. मी या परिक्रमेविषयी, त्यातील प्रवास, अडचणी, मार्ग यांबाबत सर्व माहिती घेतली आहे. कृपया मला यामध्ये सहभागी करुन घ्यावे, ही विनंती.

कळावे,

ठिकाण – सही –

दिनांक – नाव –

# कर्दळीवन पंच-परिक्रमा
# संमतीपत्र + हमीपत्र

कर्दळीवन सेवा संघातर्फे आयोजित करण्यात येणाऱ्या कर्दळीवन पंचपरिक्रमेची संपूर्ण माहिती मी करून घेतली आहे आणि ती मला पूर्णत: समजली आहे. ही परिक्रमा अवघड असून ३५ ते ४० किमी पर्यंत जंगलातून चालत प्रवास करावा लागतो, हे मला कळले आहे. त्यातील जोखीम आणि अडचणी मी समजून घेतल्या आहेत. मी या परिक्रमेत सहभागी होण्याबाबत माझे अत्यंत जवळचे कुटुंबीय आणि नातेवाईक यांना कल्पना दिली आहे.

मी हि परिक्रमा पूर्ण करण्यासाठी वैद्यकीय दृष्ट्या पूर्णपणे तंदुरुस्त आहे. परिक्रमे दरम्यान माझी वैद्यकीय जबाबदारी पूर्णतः माझ्यावरच आहे. त्याची कोणतीही जबाबदारी आयोजकांवर असणार नाही.

ही संपूर्ण परिक्रमा मी माझ्या स्वत:च्या हिंमतीवर आणि जबाबदारीवर पूर्ण करीन. श्री दत्तप्रभूंच्या आणि श्री स्वामी समर्थांच्या कृपेने आणि आशीर्वादाने ही परिक्रमा सुखरूपपणे पार पाडण्यास मी सर्व प्रकारचे सहकार्य करीन. परिक्रमेदरम्यानचे नियम आणि शिस्त यांचे मी परिक्रमा यशस्वी होण्यासाठी मन:पूर्वक पालन करीन आणि कर्दळीवन सेवा संघाला सर्व प्रकारचे सहाय्य करीन, ह्याची मी हमी देत आहे.

ठिकाण –　　　　　　　　　　सही

दिनांक –　　　　　　　　　　नाव

साक्षीदार सही –

नाव व पत्ता –